2 6 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बनावट प्रमाणपत्रप्रकरणी विद्यापीठ देणार पोलिसांत तक्रार



कोल्हापूर, ता. २५ : 'खासगी क्रीडा प्रशिक्षकांकडून सानिका सरनोबत या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे बनावट प्रमाणपत्र देण्यात आल्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडे संबंधित क्रीडापटू व पालकांची तक्रार आली आहे. हा प्रकार गंभीर असून त्या अनुषंगाने योग्य ती खातरजमा करून विद्यापीठ पोलिसांत तक्रार दाखल करेल,' अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे.

डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठाच्या सेवेत नसलेल्या एका खासगी प्रशिक्षकाने विद्यापीठाचे बोधचिन्ह वापरून बनावट, अनधिकृत प्रमाणपत्र दिल्याची तक्रार सानिका व तिच्या पालकांनी विद्यापीठ प्रशासनाकडे दाखल केली आहे. तिचा विद्यापीठाच्या संघात समावेश नव्हता. त्यामुळे कोणत्याही आंतरविद्यापीठ स्पर्धेत तिने शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेले नाही. विद्यापीठाने तिला कोणत्याही स्वरूपाचे प्रमाणपत्र देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ही बाब गंभीर स्वरूपाची असून, त्या संदर्भात तक्रारीची लवकरात लवकर योग्य ती शहानिशा केली जाईल. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या बोधचिन्हाचा फसवणुकीसाठी गैरवापर केल्याबाबत पोलिसांत तक्रारही दाखल करण्यात येईल.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे नाव, खोटे बोधचिन्ह वापरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करणार

## ● कुलसचिव डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे नाव आणि बोधचिन्ह वापरून मैदानी प्रकारातील खोटे प्रमाणपत्र देण्याची बाब गंभीर स्वरूपाची आहे. यासंदर्भात प्राप्त तक्रारीची लवकरच योग्य ती शहानिशा करून त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या बोधचिन्हाचा फसवणुकीसाठी गैरवापर केल्याबाबत पोलिसांत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली.

विद्यापीठाच्या सेवेत नसलेल्या एका खासगी प्रशिक्षकाने सानिका सरनोबत या विद्यार्थिनी क्रीडापटूस शिवाजी विद्यापीठाचे बोधचिन्ह वापरून बनावट, अनधिकृत प्रमाणपत्र प्रदान केल्याची तक्रार संबंधित विद्यार्थिनी व तिच्या पालकांनी विद्यापीठ प्रशासनाकडे केली आहे. ही विद्यार्थिनीचा विद्यापीठाच्या संघामध्ये समावेश नव्हता. त्यामुळे कोणत्याही आंतरविद्यापीठ स्पर्धेत तिने शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेले नाही. विद्यापीठाने तिला कोणत्याही स्वरूपाचे प्रमाणपत्र देण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे कुलसचिव डॉ. शिंदे यांनी पत्रकात म्हटले आहे.

अध्यापक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 MAY 2024
तरूण भारत

# 'ॲथलॅटिक्सच्या बोगस प्रमाणपत्राची चौकशी होणार'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा लोगो व बोधचिन्ह वापरून ॲथलॅटिक्स खेळाचे बोगस प्रमाणपत्र दिले आहे. अशी तक्रार खेळाडू व पालकांनी शिवाजी विद्यापीठातील क्रीडा संचालकांकडे केली आहे. विद्यापीठाच्या लोगोशी छेडछाड करणारा हा प्रकार अतिशय चिंताजनक असल्याने विद्यापीठ प्रशासनाने संबंधीताची चौकशी करण्यासाठी समिती नेमली आहे. या समितीच्यावतीने चौकशी करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील एका खेळाडूला ॲथलॅटिक्स क्रीडा प्रकारात विद्यापीठाचा लोगो वापरून बोगस प्रमाणपत्र देण्यात आले आहे. नाशिक येथील स्पर्धेसह गुवाहाटी येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी देण्यात आले. या स्पर्धेचे प्रमाणपत्र ८ जूनपर्यंत येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर झालेल्या स्पर्धांचे प्रमाणपत्र विद्यापीठाचा लोगो व बोधचिन्ह वापरून तयार करून संबंधीत खेळाडूला दिले आहे. यासंदर्भातील लेखी तक्रार खेळाडू आणि पालकांनी केली आहे.


26 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल कॅलिग्राफी, फलक लेखनाला दाद

## राज्यस्तरीय अक्षर संमेलन; शिवाजी विद्यापीठात आयोजन



कोल्हापूर : तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनात प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटताना कलाकार.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनात दुसऱ्या दिवशी डिजिटल कॅलिग्राफी व फलक लेखनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत दाद दिली. माझी शाळा, माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे त्याचे नाट्यशास्त्र विभागात आयोजन केले आहे.

नाशिकचे सचिन गडाख व सोलापूरचे अमित भोरखडे यांनी डिजिटल कॅलिग्राफीत देवनागरी व इंग्रजीसाठी ब्रश कसा निवडावा व कोणती सॉफ्टवेअर वापरावीत, याविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. मुंबईतील ज्येष्ठ सुलेखनकार अनिल गोवळकर यांनी पेन्सिल व ब्रश कॅलिग्राफीमधील दोष कसे टाळावे, उत्तमरीत्या सुलेखन कसे करावे, याविषयी माहिती दिली. ऋषिकेश उपळावीकर याने कॅरीकेचर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. मुंबईच्या हेमंत घरात, सचिन सावंत, श्रीकांत गवांडे यांनी कॅलिग्राफी, तर अमरावतीच्या मोहन हिरुरकर व पुण्यातील गणेश माने यांनी लाईव्ह स्केच काढली. कोल्हापूरच्या अशांत माने यांनी तांदूळ व सुपारीवर काढलेली चित्रे आकर्षण ठरले. मुंबईतील सुनील सूर्यवंशी यांनी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटले. वसंत अकोलकर यांनी कोलाज प्रकाराची प्रात्यक्षिके सादर केली. दुपारच्या सत्रात कऱ्हाडच्या सतीश उपळावीकर, कोल्हापूरच्या मोहन कांबळे, अहिल्यानगरचे दीपक गोंधळे, गोव्याच्या महेंद्र शिरोडकर यांनी छत्रीवरील सुलेखन व रोल पेपरवरील प्रात्यक्षिके सादर केली. दरम्यान, संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम झाला. या वेळी गृहविभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर, महसूल व वन विभागाचे सहसचिव संजय इंगळे उपस्थित होते.

# डिजिटल कॅलिग्राफी, फलक लेखनास प्रतिसाद

- राज्यस्तरीय अक्षर संमेलन; शासन स्तरावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माझी शाळा माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाची सुरुवात शनिवारी डिजिटल कॅलीग्राफीने झाली.

नाशिक येथील सचिन गडाख व सोलापूरचे अमित भोरखडे यांनी उपस्थितांना डिजिटल कॅलिग्राफीमध्ये देवनागरी व इंग्रजीसाठी ब्रश कसा निवडावा, कोणती सॉफ्टवेअर वापरावीत याविषयी प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन केले. मुंबई येथील ज्येष्ठ सुलेखनकार अनिल गोवळकर यांनी पेन्सील व ब्रश कॅलिग्राफीमधील दोष कसे टाळावे व उत्तमरीत्या सुलेखन कसे करावे, याविषयी प्रात्याक्षिकासह मार्गदर्शन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित अक्षर संमेलनात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटताना मुंबईचा कलाकार सुनील सूर्यवंशी.

ऋषीकेश उपळावीकर या तरुण कलाकाराने कॅरीकेचर करून उपस्थितांची वाहवा मिळविली. त्याचबरोबर हेमंत घरात (मुंबई), सचिन सावंत (मुंबई), श्रीकांत गवांडे (मुंबई) यांनी पपेर कॅलिग्राफी, तर मोहन हिरुरकर (अमरावती) व गणेश माने (पुणे) यांनी लाईव्ह स्केच काढले. कोल्हापूरच्या अशांत माने यांनी तांदूळ व सुपारीवर काढलेली चित्रे आकर्षण ठरली. मुंबई येथील सुनील सूर्यवंशी या कलाकाराने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटले. वसंत अकोलकर यांनी कोलाज प्रकाराची प्रात्याक्षिके सादर केली.

दुपारच्या सत्रात सतीश उपळावीकर (कराड), मोहन कांबळे (कोल्हापूर), दीपक गोंधळे (अहमदनगर), महेंद्र शिरोडकर (गोवा) यांनी उपस्थितांसमोर छत्रीवरील सुलेखन व रोल पेपरवरील प्रात्यक्षिके सादर केली. शनिवारी झालेल्या कार्यक्रमास गृहविभागाचे सहसचिव व्यंकटेश भट, मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर, महसूल व वन विभागाचे सहसचिव संजय इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यभरातील सर्व कलाकारांच्या मनोरंजनासाठी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रविवारी (दि. २६) हॅप्पी आर्ट मॉर्निंग, निसर्गचित्र प्रात्यक्षिक तसेच अक्षर सन्मान सोहळा, अक्षर संमेलनाचा समारोप होणार आहे.

2 6 MAY 2024
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल कॅलिग्राफी, फलक लेखनाला प्रतिसाद

## तिसरे राज्यस्तरीय अक्षर संमेलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माझी शाळा.. माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाची सुरुवात डिजिटल कॅलिग्राफीने झाली.

नाशिक येथील सचिन गडाख व सोलापूरचे अमित भोरखडे यांनी उपस्थितांना डिजिटल कॅलिग्राफीमध्ये देवनागरी व इंग्रजीसाठी ब्रश कसा निवडावा? कोणती सॉफ्टवेअर वापरावीत, याविषयी प्रात्यक्षिकासह, तर मुंबई येथील ज्येष्ठ सुलेखनकार अनिल गोवळकर यांनी पेन्सिल व ब्रश कॅलिग्राफीमधील दोष कसे टाळावे व उत्तमरीत्या सुलेखन कसे करावे? याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

ऋषीकेश उपळावीकर या तरुण कलाकाराने कॅरिकेचर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. त्याचबरोबर हेमंत घरात (मुंबई), सचिन सावंत (मुंबई), श्रीकांत गवांडे (मुंबई) यांनी पेपर कॅलिग्राफी, तर मोहन हिरुरकर (अमरावती) व गणेश माने (पुणे) यांनी लाईव्ह स्केच काढली. कोल्हापूरच्या अशांत माने यांनी तांदूळ व सुपारीवर काढलेली चित्रे आजच्या दिवसाचे आकर्षण ठरले. मुंबई येथील सुनील सूर्यवंशी या कलाकाराने शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे यांचे प्रत्यक्ष रेखाचित्र रेखाटले. वसंत अकोलकर यांनी कोलाज प्रकाराची प्रात्यक्षिके सादर केली. दुपारच्या सत्रामध्ये सतीश उपळावीकर (कराड), मोहन कांबळे (कोल्हापूर) दीपक गोंधळे (अहमदनगर), महेंद्र शिरोडकर (गोवा) यांनी उपस्थितांसमोर छत्रीवरील सुलेखन व रोल पेपरवरील प्रात्यक्षिके सादर केली. आजच्या दिवशी या संपूर्ण कार्यक्रमाला मा. व्यंकटेश भट (सहसचिव, गृह विभाग मंत्रालय मुंबई), कैलास बिलोणीकर (सहसचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय) व संजय इंगळे (सहसचिव, महसूल व वन विभाग महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती होती. शनिवारी राज्यभरातील सर्व कलाकारांच्या मनोरंजनासाठी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांच्या बहारदार अशा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### आजचे कार्यक्रम

हॅप्पी आर्ट मॉर्निंग, निसर्गचित्र प्रात्यक्षिक, तसेच अक्षर सन्मान सोहळा, अक्षर संमेलन समारोप.

2 6 MAY 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपजीविकेला जीविकेची जोड दिल्यास जीवन समृद्ध

## डॉ. व्ही. एन. शिंदे : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मानवाचे जीवन सुंदर होण्यासाठी उपजीविकेला जीविकेची जोड असणे महत्त्वाचे असते, या दोन बाबींचे संतुलन आयुष्य समृद्ध करते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शुक्रवारी केले. माझी शाळा, माझा फळा समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, जगावे कसे, यासाठी उपजीविका असते, तर जगायचे का, हे जीविका निश्चित करते. माणसाचे जीवन समृद्ध होण्यासाठी या दोन्ही बाबींचा समावेश आणि संतुलन असावे लागते. खरा कलाकार हा त्यातूनच निर्माण होतो.



विद्यापीठात अक्षर संमेलनाचे उद्घाटन डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. प्रशांत वाघमारे, अमित भोरकडे, शुभम गायकवाड, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, संजय शेलार, सतीश उपळावीकर, ज्ञानेश पाटमाशे यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. माजी स्वागताध्यक्ष प्रशांत वाघमारे आणि ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. अक्षर संमेलनाचे संयोजक अमित भोरकडे यांनी प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर यांनी आभार मानले. यावेळी शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक, ज्ञानेश पाटमाशे, विजागत ज्ञानेश्वर, राजेंद्र हंकारे यांच्यासह राज्यभरातील कलाकार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
2 6 MAY 2024 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बँकिंग क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचे एक पाऊल पुढे

## डॉ. पी. एस. पाटील : विद्यापीठात बँकींग प्रशिक्षणाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ बँकींग प्रशिक्षण क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांनी केले.

दि मालेगाव मर्चंट्स को–ऑप बँक, असोसिएशनच्या सदस्य व बँकांचे सेवक यांच्यासाठी आयोजित बँकींग ३६० प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते.




**कोल्हापूर : बँकींग प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना प्र. कुलगुरू पी. एस. पाटील.**

बँकेत नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना बँकींग विषयीचे समग्र ज्ञान देण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामुळे बँक कर्मचाऱ्यांची पूर्व तयारी होऊन त्यांनी ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी उपयोग होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ आणि कोल्हापूर जिल्हा बँक्स असोसिएशन यांनी नवीन बँकींग पिढी घडवण्याचे मोलाचे काम हाती घेतले असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. प्रशिक्षणात ३३ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असून १२ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले.